ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, २ सप्टेंबर, १९६४ | अंक १७

## विविध माहिती

**वैद्यकीय कॉलेजला देणगी**—अमेरिकेंतील रॉकफेलर फौंडेशननें मुंबई येथील गोवर्धनदास मेडिकल कॉलेजसाठी १ लाख ४७ हजार डॉलर्सची देणगी जाहीर केली आहे. देणगीच्या रकमेचा उपयोग वैद्यकीय संशोधनासाठी लागणारीं शास्त्रीय उपकरणें विकत घेण्यासाठी करावयाचा आहे. मदतीची रकम ४ वर्षांत मिळून देण्यांत येणार आहे. शरीररचनाशास्त्र, औषधशास्त्र, शस्त्रक्रिया, जंतुशास्त्र, इत्यादींबाबतींत संशोधन करण्यांत येणार आहे.

**उस्मानिआ विद्यापीठाचें सभागृह**—उस्मानिआ विद्यापीठानें शंखासारखा घुमट असणारें एक सभागृह बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या सभागृहांत १२०० लोक मावूं शकतील. सभागृहाला रवींद्रनाथ टागोर ह्यांचें नांव देण्यांत येणार असून त्यासाठी ८·५ लाख रुपये खर्च येणार आहे. दक्षिण भारतांत ते अशा प्रकारचें सर्वांत मोठें सभागृह होईल. निजाम धर्मादाय फंडांतून सभागृहाचा ६२ टक्के खर्च भागविण्यांत येणार आहे. सभागृहाची रचना एका स्विस कंपनीच्या साह्यानें मुक्रर करण्यांत आली आहे.

**गोव्यांतील मद्याविषयी विचारणा**—गोव्यांतील एका कंपनीनें फेणी ह्या नांवानें प्रसिद्ध असलेली दारू बनविण्यास प्रारंभ केला आहे. गोवा पोर्तुगीजांच्या अंमलाखालीं असतांना ह्या मद्याला सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. हें मद्य उंची असून त्यासाठी ऑस्ट्रेलिआसारख्या परदेशांतूनहि विचारणा होत आहे.

**ऑलिंपिक स्पर्धकांना फुकट प्रवास**—टोकिओ येथें भरणाऱ्या जागतिक ऑलिंपिक खेळांसाठी जे परदेशीय खेळाडू जातील त्यांना टोकिओ शहरांतील बसगाड्या, भुयारी आगगाड्या व ट्रॅमगाड्या ह्या वाहनांतून फुकट प्रवास करूं देण्याचा निर्णय शहराच्या व्यवस्थापकांनीं घेतला आहे. ही सवलत १५ सप्टेंबर ते ५ नोव्हेंबरपर्यंतच चालू ठेवण्यांत येईल.

**आयुर्वेदावरील दुर्मिळ ग्रंथ**—तंजावर येथील सर्फोजी सरस्वती महाल ग्रंथालयांत आयुर्वेदावरील कांहीं दुर्मिळ हस्तलिखित पोथ्या आहेत. ह्या पोथ्यांचें भाषांतर करून त्या प्रकाशित करण्यासाठी भारत सरकारनें एक संशोधन-केंद्र स्थापन केलें आहे. केंद्राच्या कामासाठी सरकार दरसाल ७८ हजार रुपये खर्च करणार आहे.

**नदीच्या लहरींचा परिणाम**— संबायतजवळ उभारण्यांत येणारें ध्रुवरन औष्णिक वीज-केंद्र ह्या महिन्यांत चालू होणार होतें. परंतु ज्या माही नदीच्या पात्राच्या पाण्याचा थंडाव्यासाठी उपयोग करण्यांत येणार होता तिनें आपलें पात्र बदलल्यामुळें केंद्र ठरल्याप्रमाणें चालू होऊं शकलें नाहीं. आतां त्यासाठी आणखी एक कोटी रुपये खर्चावे लागतील.

**भारताला स्वीडनची मदत**—स्वीडननें भारताला २ कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. त्यापैकी १·३ कोटी रुपये कर्जाऊ देण्यांत येणार असून बाकीची रक्कम देणगी म्हणून देण्यांत येईल. स्वीडनकडून भारताला मदत मिळण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. ह्या मदतींतून स्वस्त शालेय पुस्तकांना लागणारा कागद पुरविणें, विजेच्या उपकरणांसाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविणें, इत्यादि कामें करण्यांत येतील.

**हृदयव्यापार जुळवून घेऊं शकतात**—आकाशयानांतून भ्रमण करणाऱ्या व्यक्तींचें हृदय अवकाशांतील परिस्थितीशीं जुळवून घेऊन आपलें कार्य अधिक कार्यक्षमतेनें करूं शकतें अशी माहिती रशिआच्या अत्युच्च शास्त्रीय संस्थेच्या उपाध्यक्षांनीं जाहीर केली आहे. अवकाशांत भ्रमण करूं लागल्यावर माणसाचें वजन जवळजवळ नाहींसें होतें. त्यामुळें पहिल्या आठ-दहा तासांत त्याच्या कार्यांत फरक पडतो. त्यानंतर त्याचें कार्य सुयंत्र सुरू होतें असें त्यांनीं सांगितलें.

**शिक्षकमातांना मिळणारी रजा**–पंजाबमधील शिक्षिकांना अपत्य-संभवासाठी मिळणाऱ्या रजेवर मर्यादा घालण्याची योजना राज्यसरकारचें शिक्षणखातें तयार करीत आहे. ह्या शिक्षिकांना त्यांच्या नौकरीच्या कालावधींत अपत्यसंभवासाठी मिळणारी रजा फक्त तीन वेळांच देण्यांत यावी असें वरील योजनेंत सुचविण्यांत येणार आहे. शिक्षक-मातांची शाळांतील हजेरी सुधारण्यासाठी आणि कुटुंबनियोजनाचा एक उपाय म्हणून हा उपक्रम करण्यांत येत आहे.

**योगासनांचा वर्ग**—नागपूर येथें एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स योजनेतर्फे योगासनांचा वर्ग उघडण्यांत आला आहे. त्यांत भाग घेणाऱ्या नौकरांना ह्या व्यायामपद्धतीच्या रोगप्रतिबंधक व रोगपरिहारक गुणांचा फायदा देण्यासाठी हा उपक्रम करण्यांत आला आहे. अशाच प्रकारचे दोन वर्ग दिल्ली व बंगलोर येथेंहि काढण्यांत आलेले आहेत. वर्गांत येणाऱ्यांना नेहमींचीं औषधें घेण्यास मना केलेलें नाहीं.

**माजी मुख्यमंत्र्यांकडे थकलेली बाकी**—पंजाबचें सरकार राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. प्रतापसिंग कैरों, त्यांचे नातलग व पुत्र ह्यांच्याकडे थकलेल्या करांची बाकी वसूल करण्यासाठी ताबडतोब उपाययोजना करणार आहे, अशी माहिती राज्याच्या एका मंत्र्यानें दिली आहे. श्री. कैरों व त्यांचे संबंधीय ह्यांच्याकडे प्राप्तिकर, विक्रीकर व मालमत्ताकर ह्यांच्या रूपानें लक्षावधि रुपयांची थकबाकी आहे.

### ग्रामीण भागांत कामें काढण्याची सूचना

ग्रामीण भागांतील लोकांचें जीवन अधिक समृद्ध करण्याच्या दृष्टीनें तेथील लोकांना रोजगार देतील अशीं कामें काढण्याचा सल्ला नियोजन समितीचे सभासद श्री. श्रीमन्नारायण ह्यांनीं दिला आहे. शेतमजुरांच्या प्रश्नासंबंधीं समितीला सल्ला देणाऱ्या सल्लागार मंडळापुढें ते बोलत होते. ते म्हणाले कीं, ग्रामीण भागांत लाखो लोकांना पुरा वेळ काम नसतें. शिवाय त्यांच्यांतील पुष्कळांना स्वतःची जमीनहि नसते. ह्या लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी गुरांची व कोंबड्यांची पैदास करणें, डुकरें पाळणें ह्यांसारखे उद्योग चालू करतां येण्यासारखे आहेत. ह्या उद्योगांना फारसें प्रशिक्षण घ्यावें लागत नाहीं. कांहीं ठिकाणीं हे उद्योग चालू आहेत; परंतु त्यांचा अधिक विस्तार करणें आवश्यक आहे. त्याशिवाय सूत कांतण्याचा उद्योग आणि कुटीरोद्योग हेहि चालू करण्यांत यावेत. भूमिहीन मजुरांचा प्रश्न अवघड आहे. कारण त्या सर्वांना देण्याइतकी जमीनच मुळांत नाहीं. म्हणून त्यांना काम देण्यासाठी इतर मार्ग शोधण्यांत आले पाहिजेत. जमिनीची धूप थांबविण्याचीं कामें चालू करून बऱ्याच भूमिहीनांना काम देतां येईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भूमिहीन मजुरांना ५० लाख एकर जमीन वांटून देण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. त्यांपैकी १३ लाख एकर जमिनीची वांटणी कार्यक्रमाच्या पहिल्या दोन वर्षांत करण्यांत आली. चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भूमिहीनांना १५ लाख एकर जमीन वांटून देण्याचें ठरविलें आहे. ह्या जमिनीवर सुमारें २ लाख कुटुंबें नांदूं शकतील. भारतांत सुमारें १३ कोटी लोक शेतीवर काम करीत आहेत. त्यांपैकी २४ टक्के म्हणजे अंदाजें ३·१५ कोटी लोक भूमिहीन शेतमजूर असावेत.

---

### महाराष्ट्रांतील वाढती अन्नधान्याची तूट

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत महाराष्ट्रांतील अन्नधान्याची तूट वाढत चालल्याचें दिसून येतें. १९६३–६४ सालीं राज्यांत सुमारें ६६ लाख टन अन्नधान्यें आणि डाळी ह्यांचें उत्पादन झालें. राज्यांत ज्वारी मात्र जरुरीपेक्षा अधिक पिकते; पण हेंहि उत्पादन जरुरीपेक्षा थोडेंसेंच अधिक आहे. भारतांतील अन्नधान्याची तूट ह्या वर्षीं सुमारें ५० लाख टन आहे. पण त्यांपैकी २२ लाख टन अन्नधान्याची तूट महाराष्ट्रांत आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ४·५ कोटीच्या घरांत आहे. वाढत्या लोकसंख्येला पुरेसें अन्नधान्य मात्र पैदा होत नाहीं. १९६२ सालीं १६ लाख टन अन्नधान्याचा तुटवडा होता, तो १९६३ सालीं १९ लाखांपर्यंत वाढला आणि १९६४ सालीं २२ लाख टन झाला. शेतीच्या पाणीपुरवठ्याची अपुरी व्यवस्था हें तुटीचें प्रमुख कारण आहे.

---

### 'शिकंदर आणि चाणक्य' चित्रपट

पूर्व जर्मनी आणि भारत ह्यांनीं सहकार्य करून 'शिकंदर आणि चाणक्य' ह्या नांवाचा चित्रपट काढण्याचें ठरविलें आहे. बोलपटांत भूमिका करण्यासाठीं दोन्हीं देशांतील पहिल्या प्रतीच्या नटांना पाचारण करण्यांत येणार आहे. बोलपट तयार करण्यासाठी ६० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्यांपैकी फक्त ५ लाख रुपये भारत खर्च करणार आहे. बोलपटासाठी लागणारी कच्ची फिल्म आणि तांत्रिक साह्य पूर्व जर्मनी पुरविणार आहे. पूर्व युरोपमधील देशांतून हा चित्रपट दाखविण्याचे हक्क 'डेफा' नामक जर्मन कंपनीकडे राहणार आहेत. भारत व इतर देशांत तो दाखविण्याचे हक्क मुंबई सहकारी चित्रनिर्मिति संस्थेकडे राहतील. चित्रपट हिंदी व जर्मन भाषांतून काढण्यांत येणार आहे.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१. टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी : — महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ८४ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४३ लाख |
| ठेवी | ... | ३५ कोटी १४ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ७५ कोटी २५ लाख |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

वि. म. जोगळेकर,
जनरल मॅनेजर.

---

दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ – पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १¼ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |

**कायम ठेव–**

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | २·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या. सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

# अर्थ

बुधवार, २ सप्टेंबर, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना मदत

हिंदमधील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना पी. एल्. ४८० मदत कायद्याप्रमाणें उपलब्ध होणाऱ्या रुपयांच्या चलनांतील निधींतून अधिक साहाय्य देण्यासंबंधीं कांहीं सूचना अमेरिकेच्या सरकारनें भारत सरकारला केल्या असून त्यांचा सध्यां विचार चालूं आहे. ह्या सूचनांत अंतर्भूत असलेल्या तत्त्वाचा स्वीकार करावयाचा कीं नाहीं हेंच प्रथम मध्यवर्ती सरकारला ठरवावें लागेल. सध्यांची प्रथा अशी आहे कीं पी. एल्. ४८० कायद्याप्रमाणें भारत सरकारला जो माल पुरविण्यांत येतो त्याची विक्री करून आलेला पैसा अमेरिकन सरकार भारत सरकारला परत देतें. हा पैसा उभयपक्षीं मान्य असलेल्या विकासाच्या कामांसाठी कर्जाच्या अगर देणग्यांच्या स्वरूपांत पुरविण्यांत येतो. ही मदत बहुधा सार्वजनिक मालकीच्या विभागांतील कामांना अगर मूलभूत स्वरूपांच्या कामासाठीं देण्यांत येते. ह्या कामांत मुख्यत: पाणीपुरवठा, वीजपुरवठा, वाहतूक, शिक्षण, सामाजिक सुखसोयी ह्यांचा समावेश होतो. खाजगी मालकीच्या क्षेत्रांतील उद्योगधंद्यांनाहि वरील निधींतून मदत देण्यांत येते. परंतु मदत देण्याची पद्धत अप्रत्यक्ष स्वरूपाची आहे. भारताच्या इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनला आणि इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनला निधींतून कर्जें देण्यांत येतात आणि मग ह्या संघटना खाजगी उद्योगधंद्यांना पुन्हा कर्जें देतात. पी. एल्. ४८० कायद्याप्रमाणें उपलब्ध होणाऱ्या निधींतून खाजगी उद्योगधंद्यांना मिळणारी मदत अशा रीतीनें दूरान्वयी आणि कालावधि लागणारी असल्यामुळें तिची कार्यक्षमता कांहीं प्रमाणांत तरी कमी होण्याची शक्यता असते.

खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना खुद्द अमेरिकेकडून थेट रुपयाच्या चलनांत मदत मिळूं शकते. ही मदत ज्या निधींतून मिळते त्याचें नांव ‘ कूली फंड ’ असें आहे. पण ह्या निधींतून मदत मिळण्याच्या पात्रतेची कसोटी ठरलेली आहे. मदत घेणाऱ्या उद्योगधंद्यानें एखाद्या अमेरिकन कंपनीशीं सहकार्य केलेलें असेल अगर तो अमेरिकन उद्योगधंदा भारतांत उभारण्यांत येत असेल तरच त्याला वरील निधींतून साह्य मिळूं शकतें. पी. एल. ४८० कायद्याप्रमाणें उपलब्ध होणाऱ्या निधींच्या मानानें ही मदत फारच थोडी असते. त्यामुळें अर्थातच खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना मिळूं शकणाऱ्या मदतीला मर्यादा पडतात. ह्या मर्यादांची व्याप्ति वाढविण्यासाठीं अमेरिकेनें पी. एल. ४८० कायद्याप्रमाणें निर्माण होणाऱ्या निधींतून खाजगी उद्योगधंद्यांना मदत करण्याची सूचना केली असावी. हा निधि नव्यानें स्थापन करण्यांत आलेल्या एखाद्या द्रव्यविषयक संघटनेच्या स्वाधीन करावा आणि त्या संघटनेनें खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांच्या भागांची हमी पत्करावी अशा स्वरूपाची सूचना अमेरिकेनें केलेली आहे. ही सूचना मान्य करण्यांत आली तर भारत सरकारला उद्योगधंद्यांना कर्जें देणाऱ्या संघटनांत आणखी एका संघटनेची भर तरी घालावी लागेल किंवा सध्यां अस्तित्वांत असलेल्या एखाद्या संघटनेमार्फत काम करवून घ्यावें लागेल. ‘ कूली फंडा ’तून दिल्या जाणाऱ्या मदतीबाबत असलेल्या अटी रद्द करण्यांत आल्या तर उद्योगधंद्यांना त्या फंडांतून अधिक मदत देतां येणें शक्य होईल. तसें न करतां पी. एल. ४८० निधींतून खाजगी उद्योगधंद्यांस मदत करण्याचें तत्त्व स्वीकारण्यांत आलें तर ह्या निधीचाहि उपयोग खाजगी उद्योगधंद्यांना कर्जें देण्यासाठी अगर त्यांचें भाग-भांडवल उभारण्यासाठी करतां येईल.

---

## केरळमधील लोकसंख्येची भयप्रद वाढ

हिंदुस्थानच्या सर्व राज्यांत केरळ हे राज्य दाट लोकवस्तीचें म्हणून ओळखलें जातें. लहानांत लहान असलेल्या ह्या राज्याची लोकसंख्या मात्र भयप्रद वेगानें वाढत आहे. केरळ सरकारच्या अर्थशास्त्रीय आणि आंकडेशास्त्रीय संघटनेनें ह्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी दोन दिवसांचा एक परिसंवाद भरविला होता. ही संघटना लोकसंख्याविषयक प्रश्नांचा अभ्यास व संशोधनहि करते. परिसंवादांत केरळच्या दोन मंत्र्यांनीं भाग घेतला होता. ह्या विषयासंबंधीं बोलतांना राज्याचे आरोग्यमंत्री ह्यांनीं सांगितलेली माहिती परिस्थितीचें विदारक चित्र डोळ्यांपुढें उभी करते. आरोग्यमंत्र्यांनीं असें सांगितलें कीं, गेल्या ६० वर्षांच्या कालांत केरळ राज्यांतील लोकसंख्या ३०० टक्क्यांनीं वाढली आहे. ह्याच गतीनें लोकसंख्येंत वाढ होत गेल्यास लवकरच अशी परिस्थिति उत्पन्न होईल कीं, राज्यांतील लोकांना नुसते उभे राहण्यासुद्धां जागा पुरणार नाहीं. लोकसंख्येच्या भरमसाट वाढीमुळें उत्पन्न होणारे आर्थिक प्रश्न मन चिंताग्रस्त करून टाकण्याइतके गंभीर आहेत. सध्यांच अशी स्थिति आहे कीं, राज्यांत उत्पन्न होऊं शकणाऱ्या अन्नधान्याचा उपयोग करून राज्यांतील फक्त ५६ टक्के लोकांची भूक भागवितां येते. बाकीच्या लोकांची गरज भागविण्यासाठी राज्याला बाहेरून धान्य आणावें लागतें. सरकारतर्फे कुटुंबनियोजनाचा प्रचार केला जात आहे. ह्या प्रचारासंबंधीं प्रारंभीं बरीच विरोधी टीका करण्यांत आली. परंतु कुटुंबनियोजनाबद्दल लोकांची मनोवृत्ति बदलत चालली आहे. १९६३ सालापर्यंत राज्यांत कुटुंबनियोजनासंबंधीं माहिती व सल्ला देणारीं ३५ केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. त्याचबरोबर जनन थांबविणाऱ्या ३५ हजार शस्त्रक्रियाहि करण्यांत आल्या आहेत.

---

## डेक्कन शुगर फॅक्टरीज ॲसोसिएशन
### नवे अध्यक्ष व उपाध्यक्ष

डेक्कन शुगर फॅक्टरीज ॲसोसिएशनची २५ वी वार्षिक सभा दि. ८ रोजीं भरली होती. तींत १९६४-६५ सालाकरितां श्री. गोवर्धनदास जादवजी रूपारेल ( कोल्हापूर शुगर मिल्स लि. चे डायरेक्टर ) ह्यांची अध्यक्ष म्हणून आणि श्री. बाहुबलि गुलाबचंद ( रावळगांव शुगर फार्म लि. चे डायरेक्टर ) ह्यांची उपाध्यक्ष म्हणून निवडणूक झाली.

### रशिआनें अन्नधान्याची तूट कशी भरून काढली

जगांतील अत्यंत श्रीमान देश म्हणून अमेरिका प्रसिद्ध आहे. अमेरिकेची श्रीमंती औद्योगिक उत्पादनाबरोबरच शेतीच्या उत्पादनाच्या बाबतींतहि दिसून येते; म्हणूनच भारतासारख्या मागासलेल्या देशांना अमेरिका धान्याची मदत देते तशीच ती रशियासारख्या प्रगत देशालाही देऊ शकते. गेल्या वर्षी रशिआला अमेरिकेकडून ४ कोटी डॉलर्सचा गहू विकत घ्यावा लागला होता. रशिआंतील आर्थिक नियोजनांत शेतीच्या विकासाकडे दुर्लक्ष झालें अशी तक्रार पांचसात वर्षांपूर्वीपासूनच करण्यांत येत होती. परिणामीं रशिआंत अन्नधान्याचा तुटवडा वाढत चालला होता. ह्यावर उपाय म्हणून रशिअन पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं पडिक जमिनींत अन्नधान्यें पिकविण्याची मोहीम चालू केली होती. ह्या मोहिमेमुळें रशिआची अन्नधान्याची गरज कांहीं प्रमाणांत तात्पुरती भागली. परंतु नंतर ह्या जमिनीचा कस कमी झाल्याचें आढळून आलें. उदा. १९५९ सालीं कझकस्तानमधील पडीत जमिनी प्रथम लागवडीखालीं आणल्या त्यावेळीं १.९ कोटी टन अन्नधान्याचें उत्पादन झालें होतें. पण १९६३ सालीं त्याच जमिनींतून अवघें ५० लाख टन अन्नधान्य निर्माण झालें. ह्या जमिनी गवती कुरणाला योग्य असल्यामुळें त्यांत आतां पुन्हां लागवड करण्यांत येणार नाहीं. हा अनुभव जमेस धरून रशिआनें आपल्या शेतीविषयक धोरणांत बदल केला आहे. आतां नव्यानव्या जमिनी लागवडीखालीं आणण्याचे प्रयत्न करण्यापेक्षा अधिक रासायनिक खतें वापरून शेतीचें उत्पन्न वाढविण्यावर जोर देण्यांत येऊं लागला आहे. ह्याचा परिणाम आतां दिसूं लागला आहे. चालू वर्षी रशिआ स्वतःची गव्हाची गरज आपल्याच उत्पादनांत भागवूं शकेल अशीं चिन्हें दिसत आहेत.

---

### चंद्रावर जाण्यासाठी अवाढव्य खर्च

चंद्रावर आरोहण करण्यासाठी रशिआ आणि अमेरिका ह्यांच्यांत अटीतटीची स्पर्धा चालू आहे ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. आकाशांत भ्रमण करणारीं वाहनें शोधून काढण्याच्या बाबतींत रशिआनें आघाडी मारली होती. रशिआच्या मानानें अमेरिका या शास्त्रीय स्पर्धेत मागाहून आली. तरीसुद्धा आतां अमेरिका ह्या शास्त्रांत रशिआइतकीच प्रगत झाली आहे. चंद्राच्या पृष्ठभागाचीं छायाचित्रें अगदीं जवळून घेण्याच्या कामीं अमेरिकेनें नुकतेंच यश मिळविलें आहे. हीं चित्रें घेणारा अग्निबाण चंद्रावर सरळ धडक घेतो. पण त्यानंतर चंद्राची पाहणी करण्यासाठी त्यावर अलगद उतरणारा अग्निबाण घाडण्याचें अमेरिकेचें प्रयत्न चालू आहेत. हा अग्निबाण तीन पायांवर संथपणें चंद्राच्या पृष्ठभागावर उतरेल. त्याचा सर्व प्रवास पृथ्वीवरून नियंत्रित केला जाईल. अग्निबाणावर अनेक प्रकारचीं शास्त्रीय उपकरणें असतील. त्यांच्या साह्यानें तो महत्त्वाची माहिती गोळा करून पृथ्वीवरील शास्त्रज्ञांना पाठवील. चंद्रलोकाची सफर माणसाला घडवून आणण्यासाठी ही पूर्वतयारी चालू आहे आणि त्यासाठी दररोज ७ हजार कोटी रुपये खर्च करण्यांत येत आहेत. चंद्रावर जाणाऱ्या पहिल्या प्रवाशासाठी अमेरिकेला १० हजार कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. कांहींच्या मतें तर हा आकडा १५ हजार कोटींच्या घरांत जाईल. ह्या दशकांत चंद्रलोकावरील सफरीच्या संशोधनासाठी करण्यांत येत असलेला खर्च तर अवाढव्यच आहे. आकाशयानांतील प्रवासाच्या संशोधनासाठी होत असलेला हा खर्च गेल्या दोन वर्षांच्या कालांत प्रचंड झाला आहे. दरसाल २,५०० कोटी रुपये इतकी रक्कम गेल्या दोन वर्षांत ह्या कामीं खर्चली जात आहे.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवर बँक

—ः वाढविलेले नवीन व्याजाचे दर ः—

सेव्हिंग्ज बँक :–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षे–४½ टक्के, ३ वर्षे–४¾ टक्के,
४ वर्षे–५ टक्के, ५ वर्षे–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवीचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई–दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. वा [illegible], ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१ १२–१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी चेअरमन.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

( स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक )

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

संचालक मंडळ

१. श्री. एस. व्ही. कलघटगी, चेअरमन.
२. श्री. बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी., व्हाइस चेअरमन
३. श्री. एम. जी. हेरेकर
४. श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल. बी.
५. श्री. एस. एम. मुत्तुर
६. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर

श्री. एच. एस. कुलकर्णी, बी. ए., मॅनेजर.

म्हैसूर राज्यांतील शाखा: संकेश्वर, गोकाक, गोकाक फॉल्स, नंदगड, रामदुर्ग, चिकोडी, सौंदत्ती, बेळगांव, शहापूर-बेळगांव, टिळकवाडी-बेळगांव, नरगुंद, निपाणी, बैलहोंगळ, अथणी, कागवाड, बदामी, मुधोळ, हुबळी, हुकेरी, गुळेदगुड्ड, राणिबेन्नुर.

महाराष्ट्र राज्यांतील शाखा: जयसिंगपूर, वेंगुर्ला, मालवण, गडहिंग्लज, शिरोडा, चिपळूण, कणकवली, मिरज, देवगड, सावंतवाडी, बार्शी, माधवनगर.

ठेवींची रक्कम:- रु. २ कोटी, ३५ लक्षांवर

२ सर्व तऱ्हेचें बँकिंगचें काम केलें जातें.

### रशिआच्या अर्थविचारांत आतां नफ्याला स्थान ?

रशिआंतील अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांत बदल होत असल्याची लक्षणें दिसूं लागलीं आहेत. समाजवादी अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांत नफ्याला अगर तो मिळविण्याविषयींच्या प्रेरणेला गौणच काय, पण मुळींच स्थान नसते. समाजवादी अर्थव्यवस्थेत देशांतील उत्पादनाच्या एकूण वाढीवर प्रामुख्यानें भर दिलेला असतो. कारखाने अगर इतर औद्योगिक संघटना व्यक्तिश: फायदेशीर चालतात कीं नाहीं ह्याकडे लक्ष दिलें जात नाहीं. प्रत्येक कारखान्याला उत्पादनाचें उद्दिष्ट ठरवून देण्यांत आलेलें असतें. त्याचा दुरुपयोग हेतुपूर्वक केलेलाहि रशिआंत पुष्कळदा आढळून येतो. कांहीं कारखाने मालाच्या दर्जाकडे दुर्लक्ष करूनहि उद्दिष्ट गांठण्याची खटपट करतात, तर कांहीं आपली उत्पादन-क्षमता मुद्दामच कमी दाखवितात. ही पद्धत बंद करून आर्थिक नियंत्रण करांच्या व किमतींच्या साह्यानें करण्यांत आलें पाहिजे असा विचार रशिआंत आतां जोरानें पुढें येऊं लागला आहे. उत्पादनाला चालना देण्यासाठी नफ्याचा निर्देशांक तयार करण्यांत आला पाहिजे, येथपर्यंत ह्या विचाराची मजल गेली आहे. सोव्हिएट अर्थव्यवस्थेंत सुचविण्यांत आलेल्या सुधारणांत मागणी व पुरवठा ह्या तत्त्वाचाहि आधार घेण्यांत यावा असें प्रतिपादन केलें जात आहे. अर्थव्यवस्थेचा विकास साधण्याचे हे मार्ग भांडवलशाही अर्थव्यवस्थेंतील मार्गांशीं जुळते दिसत असले, तरी रशिअन अर्थशास्त्रज्ञ अद्याप तरी तसें कबूल करीत नाहींत. त्यांच्या मतानें सुचविण्यांत आलेल्या नवीन सुधारणा भांडवलशाहींतील व्यवहारपद्धतीशीं वरपांगी जुळत्या वाटल्या तरी त्यांचा गाभा वेगळाच आहे. कारण, भांडवलशाहींत भांडवलापासून उत्पन्न मिळतें आणि भांडवलदाराला भांडवलावर सुटणारी टक्केवारी त्याच्या उत्पन्नाचा उगम असते.

### विशाखापट्टम् येथील खताचा कारखाना

भारताच्या पंचवार्षिक योजनांत आतांपर्यंत शेतीच्या मानानें उद्योगधंद्यांच्या विकासावर अधिक लक्ष केंद्रित करण्यांत आलें, अशी टीका करण्यांत येत आहे. ह्या वर्षी अनुभवास आलेल्या धान्याच्या टंचाईनें आणि महागाईनें ह्या टीकेला अधिक धार चढलेली आहे. भारतामधील शेतींत वापरण्यांत येणाऱ्या रासायनिक खतांचें प्रमाण वाढविल्याशिवाय: कसोशीची शेती करतां येणार नाहीं ह्याबद्दल दुमत राहिलेलें नाहीं. म्हणून खताचा पुरवठा वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. पूर्व किनाऱ्यावरील विशाखापट्टम् येथें देशांतील सर्वांत मोठा खताचा कारखाना उभारण्यांत येत असून तो १९६६ च्या अखेरीस उत्पादनास प्रारंभ करील. कारखाना खाजगी विभागांत निघणार आहे. त्याच्या उभारणीसाठी ३२·५ कोटी रुपये भांडवल लागणार आहे कारखान्यांसाठी लागणारी ४०० एकर जागा विशाखापट्टमच्या बंदरशासनाकडून भाड्यानें घेण्यांत आली आहे. ह्या प्रकल्पाला इंपोर्ट-एक्सपोर्ट बँकेकडून १२·९६ कोटी रुपयांचें कर्ज मिळणार आहे. त्याशिवाय आंतरराष्ट्रीय विकास मंडळाकडूनहि ८·५ कोटी रुपयांची व्यवस्था होत आहे. कारखाना चालू झाल्यावर दरसाल सुमारे ११ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होणार आहे. खतांची सांठवणी करण्यासाठी विशाखापट्टम, कोकिनाडा आणि अंतर्भागांतील कांहीं शहरांत गुदामें बांधलीं जातील. खताची वाहतूक समुद्रमार्गानें करतां यावी म्हणून विशाखापट्टम् बंदरांत एक खास धक्का बांधण्यांत येईल. खताची विक्री करण्यासाठी आणि वाहतूक करण्यासाठी वेगळी संघटना उभारण्यांत येईल. ही संघटना दररोज १,२०० टन खताची वाहतूक व विक्री करण्याइतकी मोठी असेल.

### पूरनियंत्रणासाठी सहकार्य हवें

पूर्व पाकिस्तानांतील पूरग्रस्त विभागांची पाहणी करण्यासाठी आणि पूरनियंत्रणाच्या बाबतींत एंजिनिअर्सशीं चर्चा करण्यासाठी पाकिस्तानचे अध्यक्ष आयूबखान दौऱ्यावर गेले होते. त्यांचा दौरा सहा दिवसांचा होता. डाक्का येथें ह्या प्रश्नासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं पूरनियंत्रणाच्या कामीं भारत आणि पाकिस्तान ह्यांनीं सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. असें सहकार्य झाल्याशिवाय पाकिस्तान आणि पूर्व भारत ह्यांना असणाऱ्या पुराच्या धोक्याला तोंड देतां येणार नाहीं. पुरांना नियंत्रण घालण्याचें काम प्रचंड स्वरूपाचें आहे. पूर्व भारतामधील डोंगराळ भागांतून पूर्व पाकिस्तानांत ९० लाख क्युसेक्स पाण्याचा लोंढा पाकिस्तानांत घुसतो. त्यावरून ह्या प्रश्नाच्या गंभीरपणाचें स्वरूप लक्षांत येण्यासारखें आहे.

### कस्टम्स अधिकाऱ्यांपुढील नाजूक पेंच

पश्चिम जर्मनीमधील एक मोटारगाडी फ्रान्समधून परत येत होती. फ्रान्सच्या सरहद्दीवर आल्यावर फ्रेंच कस्टम्स अधिकाऱ्यांनीं ती अडवली. गाडींत एक तरुण जोडपें बसलें होतें आणि त्यामधील तरुणीनें पोहण्याचा पोषाख घातलेला होता. पण त्या पोषाखाचा वरचा भाग ती वापरीत नव्हती. सध्यां कांहीं युरोपिअन तरुणी असा पोषाख उघडपणें वापरूं लागल्या आहेत. गाडी थांबल्यावर अधिकाऱ्यांनीं गाडींत कर घेण्यास पात्र अशी कांहीं वस्तु आहे काय, म्हणून विचारणा केली. त्यावर नाहीं असें उत्तर मिळालें. पोहण्याच्या अशा तऱ्हेच्या पोषाखावर कर घेतां येतो कीं नाहीं ह्याची फ्रेंच व जर्मन अधिकाऱ्यांनीं चर्चा केली व अखेर कर न घेतां मोटार जाऊं दिली. मात्र गाडींतील तरुणीनें आपलें वक्षस्थल तात्पुरतें आच्छादून घ्यावें अशी सूचना करण्यांत आली.

### शिक्षित बेकारांच्या प्रश्नानें चिंता

शिक्षित बेकारांच्या संख्येंत वाढ होत चालल्यानें सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या तो एक चिंतेचा प्रश्न झाला आहे असें नियोजन समितीचें मत आहे. शिक्षितांमधील बेकारीची अनेक कारणें देण्यांत येत आहेत. एक असें कीं, देशाला गरज असणारीं माणसें तयार करण्याच्या कामांत ह्या गरजेची शिक्षणाशीं सांगड घालावी लागते. पण ती भारतांत घातली गेलेली नाहीं. सर्वसामान्य शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण ह्यांच्यांत समतोल राखला गेलेला नाहीं. दिलेलें शिक्षण त्याच्या वापराचे अभावीं वाया गेलेलें आढळून येतें. त्याचप्रमाणें शाळा व कॉलेजांतून शिकून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचा दर्जा अगदींच हलका असतो. ह्या विद्यार्थ्यांपैकीं बहुसंख्य विद्यार्थी पब्लिक सर्व्हिस परीक्षांतून नापास होतात अगर तिसऱ्या वर्गांत उत्तीर्ण होतात; नौकरी मिळण्याचा संभव अर्थातच कमी होतो.

### मोठ्या बँकांचे ठेवींना आकर्षण

लोकांची बचत खेचून घेण्याचा बँकांचा प्रयत्न त्यांच्या आकारावर अवलंबून असतो. अमेरिकन बँकिंग असोसिएशननें अमेरिकेंतील २,१६७ बँकांची पाहणी करून हा निष्कर्ष काढला आहे. निष्कर्षांत आढळून आलेल्या इतर कांहीं बाबी—(१) ठेवी आकर्षण्यासाठी मोठ्या बँका आपल्या नोकरांना जास्त मोठ्या प्रमाणावर प्रलोभनें ठेवतात. (२) मोठ्या बँका ठेवींच्या बाबत अधिक बारेबर पाहण्या करतात. (३) ठेवीदारांना मोठ्या बँका आनुषंगिक फायदे जास्त देतात. (४) त्या बँका वर्षांतून जास्त वेळां ठेवीदारांना व्याज देतात. (५) मोठ्या बँकांकडेच ठेवींची वाढ सातत्यानें होते.

### ऑस्ट्रेलिआचा प्रच्छन्न वर्णविरोध

दक्षिण आफ्रिकेच्या सरकारचा वर्णविरोध जाहीर झालेला आहे पण ऑस्ट्रेलिआ हेच धोरण प्रच्छन्नपणें अमलांत आणीत आहे. सीलोनमधील एका कुटुंबाला तें कुटुंब युरोपमधील नाहीं म्हणून ऑस्ट्रेलियांत स्थायिक होण्यास परवानगी नाकारण्यांत आली. ऑस्ट्रेलिआंत दरसाल १ लाख २५ हजार परदेशीय लोक कायमचे रहिवासी म्हणून येतात. ब्रिटन, हॉलंड, जर्मनी, स्वडिन, नॉर्वे इत्यादि देशांतून रहिवासी यावे म्हणून ऑस्ट्रेलिआ दरसाल १५ कोटी रुपये खर्च करतो. इटली, ग्रीस, स्पेन ह्या देशांतूनहि रहिवासी यावेत म्हणून प्रयत्न करण्यांत येतात. परंतु ह्या रहिवाशांची कातडी चांगली गोरी आहे किंवा नाहीं ह्याची शहानिशा प्रथम करण्यांत येते. शामल वर्णाच्या इटालिअन नागरिकालाहि ऑस्ट्रेलिआंत प्रवेश करणें कठीण जातें.

---

### अप्रगत देशांना जपानची मदतयोजना

अप्रगत देशांना आर्थिक मदत करण्याची एक योजना जपानचें सरकार तयार करीत आहे. संकल्पित योजनेप्रमाणें जपानचें सरकार अशा देशांना १० कोटी डॉलर्सची रक्कम कर्जाऊ देईल. मात्र ज्या देशांशीं जपानच्या असलेल्या व्यापारांत जपानला अनुकूल अशी तफावत असेल त्याच देशांना वरील निधींतून मदत देण्याचा इरादा आहे. ह्या योजनेचा फायदा भारताला मिळण्याचा फारसा संभव नाहीं. कारण, भारत व जपान ह्यांच्यांत आयात-निर्यात व्यापाराचा समतोल आहे. भारत जपानकडून निर्यातीपेक्षा थोडी अधिक आयात करीत असला तरी हा फरक अल्प आहे. जपानचे व्यापारी संबंध २८ अप्रगत देशांशीं आहेत. योजना अमलांत आल्यास कर्जाच्या मुदती २० वर्षांच्या राहतील.

---

### गुरांच्या वाढीविरुद्ध संततिप्रतिबंधक उपाय

हिंदमधील गुरांच्या भरमसाठ वाढीला आळा घालण्यासाठी उपयुक्त ठरतील असे संततिप्रतिबंधक उपाय शोधून काढण्याचे प्रयत्न अमेरिकेच्या शेतकी खात्यातर्फे केले जाणार आहेत. ह्या बाबतींत जरूर तें संशोधन करण्यासाठी अमेरिकेने १२ हजार डॉलर्स अथवा ६० हजार रुपये मंजर केले आहेत. जरुरीपेक्षा अधिक असणाऱ्या गुरांची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था फक्त भारतांतच नाहीं. ज्या देशांत गाईबैलांचें मांस खातात तेथें गुरांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. गुरांच्या संततीला प्रतिबंध करण्यासारखा कार्यक्षम उपाय लवकरच सांपडेल असा विश्वास अमेरिकन शेतकी संशोधनखात्याच्या प्रमुखाला वाटत आहे. अमेरिकेंतील कॅथॉलिक पंथाचा माणसाच्या कुटुंबनियोजनाला विरोध असला तरी गुरांच्या बाबतींत नाहीं.

---

### दि पूना मर्चंट्स को. बँक लि.

वरील बँकेचें खपलेलें भांडवल ४,९२,७०० रु. चें असून वसूल भांडवल २,९९,६०० रु. आहे. शेअर सस्पेन्सखातीं ५०,७८० रु. आहेत. ही रक्कम ८४५ भागांची होत आहे. (प्रत्येकी ६० रु. वसूल). बँकेची स्कूटर्स, रिक्षा आणि मोटार. गॅरंटीजबाबत योजलेली ठेव-पद्धति आकर्षक आणि लोकप्रिय झाली आहे. बँकेस पुणें म्यु. कॉर्पोरेशनचे बँकर्स होण्याचा बहुमान मिळाला आहे.

(चेअरमन: म. सा. शेळके, व्हा. चेअरमन: वा. शि. गडबोले. एजंट: भ. ग. साळवे).


---





बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
कुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था गिरगांव, मुंबई ४.

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग


तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

## राष्ट्रीय उत्पन्नांत १९६३–६४ मध्यें वाढ

१९६२–६३ चे मानानें १९६३–६४ मध्यें भारताचें राष्ट्रीय उत्पन्न ४·३% नें वाढलें. त्यापूर्वींच्या वर्षी २·५% आणि त्याच्याहि पूर्वींच्या वर्षी २·४ वाढ झाली होती. सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशननें आंकडेवारी जमवून काढलेला हा निष्कर्ष आहे; तो अधिक माहितीनंतर थोडा बदलण्याचा संभव आहे. १९६३–६४ मध्यें शेतीमधील झालेल्या वाढीमुळेंच मुख्यत: राष्ट्रीय उत्पन्न सुधारलें आहे. तांदळाच्या उत्पन्नांत १४% वाढ झाली, पण इतर धान्यांचें उत्पादन १% नें घटून, सर्व अन्नधान्यांचा एकत्रित विचार करतां ०·७% वाढ प्रत्यक्ष पदरांत पडली. ऊंस, कपास, भुइमूग, इत्यादि पिकांच्या उत्पन्नांतील वाढीमुळें शेतीच्या उत्पन्नांत एकूण १·५% वाढ झालेली आढळते. खाणी, कारखाने, वहातूक, रेल्वेज, बँकिंग, विमा, इत्यादींचें उत्पन्न ८ ते ९ % गतीनें वाढत राहिलें आहे.

(१९४८–४९ मधील किमतीच्या आधारावर)

| उत्पन्नाची बाब | १९६२-६३ मधील एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशीं प्रमाण% | १९६२-६३चे मानानें १९६३-६४ मधील वाढ | वर्षातील % वाढींतील हिस्सा |
|---|---|---|---|
| शेती | ३६·९ | १·५ | ०·५ |
| खाणी, कारखाने | १०·० | ९·१ | ०·९ |
| टपाल, टेलिफोन वगैरे | ०·५ | ८·७ | ०·१ |
| रेल्वेज | २·७ | ७·८ | ०·२ |
| विमा, बँकिंग | १·१ | ७·९ | ०·१ |
| इतर व्यापार, वाहतूक | १५·४ | ४·४ | ०·७ |
| इतर | ३३·४ | ·५४ | १·८ |
| सर्व बाबी मिळून | १००·० | ४·३ | ४·३ |

### दर डोई उत्पन्नांत सालोसाल वाढ

| वर्षे | रु. |
|---|---|
| १९५०-५१ | २४७·५ |
| १९५५-५६ | २६७·८ |
| १९६०-६१ | २९३·२ |
| १९६१-६२ | २९४·६ |
| १९६२-६३ | २९४·७ |
| १९६३-६४ | ...... |

### इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.

वरील बँकेच्या सभासदांची संख्या गेल्या वर्षी १२९५ ची १७२८ झाली; शेअर भांडवल १,६९,६०० रु. चें २,३७,६०० रु. झालें. ठेवी ५३ लक्ष रुपयांच्या ९ लक्ष रु. वर गेल्या. बँकेला निव्वळ नफा ३२,७२४ रु. झाला. जीवनांत सुखोपयोगी सायकल, रेडिओ, शिवणयंत्रें, अशासारख्या वस्तू हप्तेबंदीनें पुरविण्याचें कार्य बँक करीत आहे. बँकेच्या बचतगृह पेटी योजनेंत दरमहा सुमारें ४ हजार ठेव गोळा होते. ७–२–६३ रोजीं स्थापन झालेल्या ह्या बँकेनें दीड वर्षाच्याहिपेक्षा कमी अवधींत उत्कृष्ट प्रगति केली आहे.

**चेअरमन :** कल्लाप्पा बाबूराव आवाडे.
**व्हा. चेअरमन :** शंकरराव रामचंद्र हुपरे.
**मॅनेजर :** रामचंद्र पुंडलीक कुलकर्णी.

### टिस्कोचा कामगारांना बोनस

टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. नें टाटा वर्कर्स युनियनच्या संमतीनें १६५ लक्ष रु. बोनस म्हणून वाटण्याचें ठरविलें आहे. पगाराच्या किंवा मजुरीच्या २२·१% एवढें बोनसचें प्रमाण पडलें.

### इं. फि. कॉर्पोरेशनचे ६ कोटी रु. चे बाँड

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें ६ कोटी रुपयांचे बाँड विक्रीस काढण्याचें ठरविलें आहे. ३२·६९ कोटी रुपयांचे बाँड कॉर्पोरेशननें ह्यापूर्वी विकलेले आहेत. प्रायव्हेट सेक्टरमधील उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठी स्वत:चें सेळतें भांडवल वाढविणें, हा त्याचा उद्देश आहे. बाँडची परतफेडीची मुदत १२ वर्षे असून व्याजाचा दर ४३/४% आहे. विक्रीची किंमत १०० रु. च्या बाँडला ९९·२५ रु. आहे. १५ सप्टेंबर रोजीं विक्रीस प्रारंभ होईल. मध्यवर्ती सरकारनें त्यांची दर्शनी किंमत आणि व्याज ह्यांच्या फेडीची हमी घेतली असून ट्रस्ट ॲक्ट, इन्शुअरन्स ॲक्ट आणि बँकिंग कंपनीज ॲक्ट ह्यांची त्यांस मान्यता आहे.

### इंग्लंड सोडण्यास नाखूष असलेले विद्यार्थी

ग्रेटब्रिटनमधील शिक्षण संपलें तरी स्वदेशीं परत न जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असून त्यांनीं मोठी पंचाईत निर्माण केली आहे, असें कॉमनवेल्थ स्कॉलरशिप अँड फेलोशिप प्लॅनच्या वार्षिक अहवालांत म्हटलें आहे.

### भारतांतील वृत्तपत्रांची आंकडेवारी : खपांत ५·४% वाढ

१९६३ मध्यें भारतांतील वृत्तपत्रांच्या आणि नियतकालिकांच्या खपांत ५·४% वाढ झाली; एकूण ४५७० वृत्तपत्रांचा खप २०२·९१ लाख प्रती होता. ह्या वृत्तपत्रांपैकी ५०३ दैनिकें असून त्यांतील सर्वांत जास्त म्हणजे ७४ महाराष्ट्रांतील आहेत.

काँग्रेस पक्षाच्या मालकीच्या वृत्तपत्रांची संख्या सर्वांत जास्त म्हणजे २९ होती. त्या खालोखाल कम्युनिस्ट पक्षाची २५ आणि प्रजा समाजवादी पक्षाची ९ होती. कम्युनिस्ट पत्रांचा खप सर्वांत जास्त होता.

नऊ दैनिकांचा प्रत्येकी खप एक लाख प्रतींहून अधिक होता. सर्वांत जास्त खप (एका आवृत्तीचा) आनंद बझार पत्रिका ह्या बंगाली दैनिकाचा होता, (१,४६,८१९ प्रती). एकूण ३०८ दैनिकांच्या संपादनांत ५१९९ पत्रकार गुंतलेले होते.

| भाषानुसार दैनिकें | संख्या | खप (लाखांत) |
|---|---|---|
| हिंदी | १४२ | ७·६४ |
| उर्दू | ६४ | २·६० |
| इंग्रजी | ५४ | १४·५२ |
| मराठी | ४१ | ५·३६ |
| मल्याळम | ३९ | ६·१३ |
| कन्नड | ३४ | १·७४ |
| गुजराती | ३३ | ४·४१ |
| तमीळ | २९ | ६·८८ |
| पंजाबी | १५ | ०·४६ |
| तेलगु | १३ | १·७७ |
| बंगाली | ९ | ३·०३ |
| उडिया | ५ | ०·७५ |
| आसामी | १ | ०·७ |
| इतर (द्विभाषिक व बहुभाषिक) | २४ | ०·४३ |

### दि सरकार कारबोनिक गॅस कं. लि.

वरील कंपनीला ३१ मार्च, १९६४ अखेर संपलेल्या वर्षी १४·८१ लक्ष रु. ठोक नफा झाला. विक्रीचें उत्पन्न २३·०५ लक्ष रु. चें ३५·४० लक्ष रु. झालें. घसारा, करांची तरतूद, मॅ. एजंटांचा मुशाहिरा, इत्यादींची तरतूद करून ३·७६ लक्ष रु. निव्वळ नफा उरला. कंपनीची दिल्ली येथील फॅक्टरी मे, १९६४ मध्यें सुरू झाली.

**मोटारगाड्यांची वर्गवारी नाहीं**—भारतांत सुमारें ८ लाख, ५० हजार मोटारगाड्या आहेत. परंतु खाजगी मोटारी, बसगाड्या, मालवाहू गाड्या, अशा प्रकारानें त्यांची नीट वर्गवारी उपलब्ध नाहीं. त्यामुळें त्यांना कोणत्या प्रकारचे सुटे भाग किती लागतात ह्याची आंकडेवार माहिती उपलब्ध होत नाहीं. परिणामी मोटारीला लागणाऱ्या अनेक प्रकारच्या मालाचें उत्पादन आणि त्याची मागणी ह्यांचा मेळ घालणें अशक्य होऊन बसते. तेलकंपन्या, टायरकंपन्या व रबरकंपन्या ह्यांनीं ह्या बाबतींत बाजारपेठेचें संशोधन हातीं घेण्याची जरुरी आहे.

**५,२०० कोटी रुपयांची यंत्रसामग्री**—चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील यंत्रसामग्रीची गरज भागविण्यासाठी येत्या सहा वर्षांत भारतांत ५,२०० कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री तयार करण्यांत येणार आहे. ह्या यंत्रसामग्रींत विजेची वाहतूकविषयक यंत्रें, औद्योगिक यंत्रसामग्री आणि शेतीचीं अवजारें ह्यांचा समावेश आहे.

**साखरेचा सहकारी कारखाना**—राजकोट जिल्ह्यांतील कांहीं शेतकऱ्यांनीं साखरेचा सहकारी कारखाना काढण्याचा विचार चालविला आहे. कारखान्यासाठी २५ लाख रुपयांचें भांडवल हे शेतकरी जमविणार आहेत. राजकोट विभागांत अलीकडे पाणीपुरवठ्याच्या अधिक चांगल्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत. त्याचा फायदा घेऊन उंसाची लागवड करण्याचा त्यांचा बेत आहे.

**पाकिस्तान-चीन बोटवाहतूक**—पाकिस्तान नॅशनल शिपिंग कॉर्पोरेशननें परदेशांशीं बोटींची वाहतूक चालू करण्याची योजना आखली आहे. ह्या योजनेंत चीन व जपान ह्यांचा समावेश आहे. चीन व पाकिस्तान ह्यांच्यामधील बोटवाहतूक चार महिन्यांच्या अवधींत सुरू होईल असा अंदाज आहे. चीनशीं व्यापारी संबंध वाढविण्याच्या पाकिस्तानच्या धोरणांतील हें पाऊल आहे.

**ब्रिटनचा चीनशीं वाढता व्यापार**—ह्या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत ब्रिटनकडून चीनला होणाऱ्या निर्यातींत मागील वर्षाच्या मानानें दुप्पट वाढ झाली आहे. १९६३ सालाच्या पहिल्या सहामाहींत ४४ लाख पौंडांचा माल ब्रिटननें चीनला निर्यात केला होता. ह्या वर्षीच्या पहिल्या सहामाहीत ९१ लाख पौंडांचा माल निर्यात करण्यांत आला. ह्या मालांत यांत्रिक हत्यारें, खाणींची यंत्रसामग्री, विमानें आणि विमानांचे सुटे भाग, ह्यांचा समावेश आहे.

**अमरनाथला जाणारे यात्रेकरू**—काश्मीरमधील 'अमरनाथ' च्या गुहेंत असणाऱ्या बर्फाच्या शिवलिंगाचें दर्शन घेण्यासाठी ६,००० यात्रेकरू आले होते. ह्या शिवलिंगाचें दर्शन घेण्यासाठी यात्रेकरूंना ४५ किलोमीटर पायीं यावें लागतें. 'अमरनाथ' ची गुहा बर्फाच्छादित शिखरांनीं वेढलेली असून यात्रेचें एक पवित्र ठिकाण म्हणून ती प्रसिद्ध आहे. तिची समुद्रसपाटीपासून उंची १२,२७९ फूट आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



शीतल, झुळझुळीत,
आणि वापरायला
अत्यंत मनोरम व सुखद
ठाकरसी
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती　फॅब्रिक्स
या कापडावर असें लेबल असतें
·SANFORIZED·
THACKERSEY FABRICS
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
● धी हिंदुस्तान स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड
● धी क्राउन स्पिनिंग अँड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
● धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.